## नि.क्र.१५ खालील आदेश

(दिनांक ३०–०३–२०२४ रोजी पारीत)

१. अर्जदारांनी प्रस्तुत अर्ज गैरअर्जदाराचे पगारातुन पोटगीची रक्कम कपात करुन मिळण्याबाबत दाखल केला आहे. अर्जदारांचे वकीलांनी गैरअर्जदाराचे पगारातुन पोटगीची थकीत रक्कम रु.३,९५,०००/– कपात करुन अर्जदार क्र.१ चे बँक खात्यात जमा करण्यासाठी संबंधी आहरण व संवितरण अधिकारी यांना निर्देश देण्याची विनंती केली.

२. गैरअर्जदाराने म्हणणे सादर करुन अर्जास प्रखर विरोध दर्शविला. त्यांनी पुढे कथन केले आहे की, अर्जदारांनी गैरअर्जदार हा नियमीत काम करुन कमवितो, हे दर्शविण्याकरीता कोणतेही कागदपत्र दाखल केले नाहीत. तसेच अर्जदारांनी अर्जात नमुद केलेल्या कंपनीचे पत्र देखील दाखल केले नाही. त्याचप्रमाणे अर्जदारांनी गैरअर्जदारास कारणे दाखवा नोटीस देखील दिला नाही. सबब, प्रस्तुत अर्ज चालविता येत नाही. त्यामुळे त्यांनी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, दि.२८/१०/२०२२ रोजी या प्रकरणातील मुख्य प्रकरण २/२०२० मधील नि.क्र.१२ वरील आदेशानुसार गैरअर्जदारास अर्जदार क्र.१ हिस दरमहा रु.१७,०००/– व अर्जदार क्र.२ यास दरमहा रु.८,०००/– अंतरिम पोटगी अर्ज दाखल तारखेपासुन देण्यास आदेशीत केले आहे. गैरअर्जदाराने सदर आदेशाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील दाखल केल्याचे किंवा तो आदेश रद्दबातल केल्याबाबत कोणतेही दस्तऐवज अभिलेखावर दाखल केले नाहीत.

४. अभीलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते, गैरअर्जदाराने नि.क्र.१२ वरील आदेशाचे पालनार्थ अर्जदारांना कोणतीही पोटगी दिली नाही. गैरअर्जदाराकडे दि.१२/१०/२०२० ते दि.२६/०३/२०२२ अशी एकुण १७ महिन्यांची दरमहा रु.२५,०००/– प्रमाणे एकुण रु.४,२५,०००/– पोटगी थकीत होती. त्यापैकी गैरअर्जदाराने दि.०१४/०५/२०२२ रोजी रु.३०,०००/– पोटगी

रक्कम अदा केली आहे. त्यानंतर गैरअर्जदाराने अर्जदारांना पोटगी रक्कम अदा केली नाही.

५. गैरअर्जदाराचे विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद सादर केला की, अर्जदारांना केवळ एका वर्षाची पोटगी रक्कम वसुल करता येते, त्यानंतरची पोटगी रक्कम त्यांना वसुल करता येत नाही. तसेच गैरअर्जदाराविरुध्द जप्तीची कारवाई करण्यापुर्वी सदरचा अर्ज चालविता येत नाही. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, अर्जदारांनी गैरअर्जदाराविरुध्द जप्तीची कारवाई केली. परंतु, त्याची पुर्तता झाली नाही. त्याचप्रमाणे सदरचा अर्ज दि.०४/०४/२०२२ रोजी दाखल करण्यात आला आहे. परंतु, त्यापुर्वी अर्जदारांनी मुख्य प्रकरण २/२०२० मध्ये पोटगी रक्कम वसुली करीता कारवाई केल्याचे दिसुन येते. त्या प्रकरणातील नि.क्र.१९,२४ व २५ वरील दि.२९/०१/२०२२ चे संयुक्त आदेशानुसार अर्जदारांनी पोटगी वसुलीकरीता सदरचे प्रकरण दाखल केल्याचे दिसुन येते. सबब, अर्जदारांनी मुख्य प्रकरणामध्ये पोटगीची रक्कम वसुल करण्याकरीता कारवाई केल्याचे दिसुन येते. अर्जदारांनी सदभावनेतुन ती कृती केल्याचे दिसुन येते. तसेच त्यांना ती कारवाई करण्यास पुरेसे कारण घडल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदारांना थकीत पोटगीची रक्कम वसुल करण्याचा अधिकार आहे. अशा परिस्थीतीमध्ये गैरअर्जदाराचे विद्वान वकीलांचा उपरोक्त युक्तीवाद ग्राहय धरता येत नाही.

६. अर्जातील कथनांवरुन असे दिसुन येते की, गैरअर्जदार हा फोर्टीस फायनॅनशियल सर्वीसेस लिमिटेड, ठाणे या कंपनीमध्ये नोकरीस आहे. गैरअर्जदाराने आजपर्यंत केवळ नाममात्र रु.३०,०००/– चे पोटगीची तजविज केली. परंतु, त्यानंतर अर्जदारांचे पोटगीची कोणतीही तजविज केली नाही. आज रोजी अर्जदाराकडे रु.३,९५,०००/– एवढी पोटगी रक्कम थकीत आहे. अर्जदार हे सर्वस्वी पोटगी रकमेवर अवलंबुन असल्याचे दिसते. अभिलेखावरुन गैरअर्जदाराने पोटगी रक्कम भरण्यास टाळाटाळ केल्याचे दिसुन येते. अशा परिस्थीतीमध्ये गैरअर्जदाराची वागणुक पाहता त्याचे कार्यालयातील आहरण व संवितरण अधिका–यास गैरअर्जदाराचे पगारातुन थकीत पोटगी रक्कम वजा करुन अर्जदार क्र.१ चे बचत खात्यात जमा

करण्यासाठी निर्देश देणे, न्यायोचीत ठरेल. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

०१. आहरण व संवितरण अधिकारी, फोर्टीस फायनॅनशियल सर्वीसेस लिमिटेड, ठाणे, जि.ठाणे यांनी गैरअर्जदाराकडे थकीत असलेली पोटगी रक्कम रु.३,९५,०००/–(अक्षरी रु.तीन लाख पंच्यान्नव हजार फक्त) करीता दरमहा रु.२५,०००/– (अक्षरी रुपये पंचवीस हजार फक्त) कपात करुन ते दिवाणी व फौजदारी न्यायालय (कनिष्ठ स्तर), सिंदेवाही येथे जमा करावी व थकीत पोटगी रक्कम रु.३,९५,०००/– वसुल झाल्यानंतर कपात करणे बंद करावे.

०२. सदर आदेशाची प्रत फोर्टीस फायनॅनशियल सर्वीसेस लिमिटेड, ठाणे, जि.ठाणे यांना अंमलबजावणीसाठी तात्काळ पाठविण्यात यावी.

Digitally signed by SHAHAJI DATTARAO BHOSLE

**(शहाजी दत्तराव भोसले)**

दिनांक–३०/०३/२०२४ न्यायदंडाधिकारी, प्रथम श्रेणी, सिंदेवाही

मी, प्रसाद सुरेशराव पोहनकर, लघुलेखक (दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) तथा न्यायदंडाधिकारी, (प्र.श्रे.), सिंदेवाही) याची पुष्टी करतो की, या पी.डी.एफ. ची सामग्री ही मुळ न्यायनिर्णयाच्या शब्दाप्रमाणेच शब्द आहे.